RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ४(४)] गुरुवार, जानेवारी ८, २०२६/पौष १८, शके १९४७ [पृष्ठे १९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जानेवारी, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वित्त नियंत्रक या पदावरील सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायदाच्या कलम १८४ च्या उप कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा १५ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

**सेवाप्रवेश नियमाचे प्रारूप**

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील लेखा सेवेतील वित्त नियंत्रक (सेवाप्रवेश) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) " विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(क) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्राधिकरणाच्या नियंत्रणातील वित्त नियंत्रक या पदावरील नियुक्ती, महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील सहसंचालक या पदावर कार्यरत अधिकाऱ्यांमधून शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रक / आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार.—

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय / संमतीशिवाय परस्पर नियुक्ती करता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला प्राधिकरणाच्या सेवेत नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित कवडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 8th January 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.

No. SEPRANI-2020/C.R.93/GRUNIBHU.— The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (i) of sub-section (*2*) of section 184 read with sub-section (*5*) of section 19 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all the existing rules, notifications, orders or any other instruments issued in this behalf to regulate recruitment to the post of Finance Controller on the establishment of the Maharashtra Housing and Area Development Authority, is hereby published, as required by sub-section (*3*) of section 184 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 15th of January 2026.

2. Any objection or suggestions, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft rules before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Finance Controller, Maharashtra Housing and Area Development Authority (Recruitment) Rules, 2025.

2. In these rules, unless the context requires otherwise,-

(a) " Authority " means the Maharashtra Housing and Area Development Authority established under section 3 of Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977);

(b) " Department " means the Housing Department of Government of Maharashtra;

(c) " Government" means the Government of Maharashtra;

3. Appointment to the post of Finance Controller on the establishment of the Authority, shall be made by deputation of a person holding the post of Joint Director in the Maharashtra Finance and Accounts Cadre in accordance with the terms and conditions specified in the rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time.

4. The terms and conditions specified by the Government, from time to time, shall apply to the person appointed to the post mentioned in rule 3 after his appointment in the service of the Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT KAWADE,
Deputy Secretary to Government.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ८ जानेवारी, २०२६

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य लेखाधिकारी या पदावरील सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायदाच्या कलम १८४ च्या उप कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा १५ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

### सेवाप्रवेश नियमाचे प्रारूप

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील लेखा सेवेतील मुख्य लेखाधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) " विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(क) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(ड) " पदोन्नतीसाठी पात्रता " म्हणजे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम किंवा आदेशाद्वारे निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्तीनुसार पदोन्नतीसाठी पात्रता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य लेखाधिकारी या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये लेखाधिकारी हे पद धारण करणाऱ्या तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या अधिकाऱ्यांमधून पात्रता व सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल तर, त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल, तर त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, संचालक माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांचे संगणक हाताळण्याबाबतचे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.

७. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेला व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात / कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

८. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला प्राधिकरणाच्या सेवेत नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित कवडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 8th January 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Housing and Area Development Act, 1976.

No. SEPRANI-2020/C.R.93/GRUNIBHU.— The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (i) of sub-section (*2*) of section 184 read with sub-section (*5*) of section 19 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all the existing rules, notifications, orders or any other instruments issued in this behalf to regulate recruitment to the post of Chief Accounts Officer on the establishment of the Maharashtra Housing and Area Development Authority, is hereby published, as required by sub-section (*3*) of section 184 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 15th of January 2026.

2. Any objection or suggestions, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft rules before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Chief Accounts Officer, Maharashtra Housing and Area Development Authority (Recruitment) Rules, 2025.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(a) "Authority " means the Maharashtra Housing and Area Development Authority established under section 3 of Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977) ;

(b) "Department" means Housing Department of Government of Maharashtra ;

(c) "eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department, from time to time ;

(d) "Government" means the Government of Maharashtra;

3. Appointment to the post of Chief Accounts Officer on the establishment of the Authority, shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Accounts Officer on the establishment of the Authority and having not less than three years of regular and continuous service on that post.

4. A person before being appointed to the post mentioned in rule 3 on promotion shall be required to pass the Departmental Examination if necessary, unless he has been exempted from passing the same.

5. A person appointed to post mentioned in rule 3 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post. Otherwise, such person shall not be eligible for promotion on the post mentioned in rule 3.

6. A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess Certificate of Computer Operation prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said post.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred to any of the Board Office within the jurisdiction of the Authority in the State of Maharashtra.

8. The terms and conditions specified by the Government, from time to time, shall apply to the person appointed to the post mentioned in rule 3 after his appointment in the service of the Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT KAWADE,
Deputy Secretary to Government.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जानेवारी,२०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील लेखाधिकारी या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायदाच्या कलम १८४ च्या उप कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा १५ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

### सेवाप्रवेश नियमाचे प्रारूप

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील लेखा सेवेतील लेखाधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) “ शासन ” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) “ विभाग ” याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(क) “ प्राधिकरण ” म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(ड) “पदोन्नतीसाठी पात्रता” म्हणजे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम किंवा आदेशाद्वारे निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती नुसार पदोन्नतीसाठी पात्रता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील लेखाधिकारी या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये पुढील नियमानुसार करण्यात येईल.

(अ) प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहायक लेखाधिकारी हे पद धारण करणाऱ्या तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या अधिकाऱ्यांमधून पात्रता व सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन ;

किंवा

(ब) संचालक, लेखा व कोषागरे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (MFAS गट-अ कनिष्ठ) या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपध्दतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय / संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ९० : १० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल तर, त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल, तर त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, संचालक माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांचे संगणक हाताळण्याबाबतचे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.

८. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेला व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात / कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

९. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला प्राधिकरणाच्या सेवेत नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित कवडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 8th January 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.

No.SEPRANI-2020/C.R.93/GRUNIBHU.— The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (i) of sub-section (*2*) of section 184 read with sub-section (*5*) of section 19 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all the existing rules, notifications, orders or any other instruments issued in this behalf to regulate recruitment to the post of Accounts Officer on the establishment of the Maharashtra Housing and Area Development Authority, is hereby published, as required by sub-section (*3*) of section 184 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 15th of January 2026.

2. Any objection or suggestions, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft rules before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Accounts Officer, Maharashtra Housing and Area Development Authority (Recruitment) Rules, 2025.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(a) "Authority " means the Maharashtra Housing and Area Development Authority established under section 3 of Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977) ;

(b) " Department " means Housing Department of Government of Maharashtra ;

(c) " Government " means the Government of Maharashtra ;

(d) "eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time ;

3. Appointment to the post of Accounts Officer on the establishment of the Authority, shall be made either,—

(1) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Assistant Accounts Officer on the establishment of the Authority and having not less than three years of regular and continuous service on that post ; or

(2) by deputation of a person who is having not less than three years of regular and continuous service on the equivalent post in the Maharashtra Finance and Accounts Service (MFAS Group-A Junior) under the jurisdiction of the Director, Accounts and Treasury in accordance with the terms and conditions specified in the rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time.

4. The appointment to the post mentioned in rule 3 by promotion and deputation shall be made in the ratio of 90:10.

5. A person before being appointed to the post mentioned in rule 3 on promotion shall be required to pass the Departmental Examination, if necessary, unless he has been exempted from passing the same.

6. A person appointed to post mentioned in rule 3 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post. Otherwise, such person shall not be eligible for promotion on the post mentioned in rule 3.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess Certificate of Computer Operation prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said post.

8. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred to any of the Board Office within the jurisdiction of the Authority in the State of Maharashtra.

9. The terms and conditions specified by the Government, from time to time, shall apply to the person appointed to the post mentioned in rule 3 after his appointment in the service of the Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT KAWADE,
Deputy Secretary to Government.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ८ जानेवारी २०२६

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम(२) च्या खंड(एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहाय्यक लेखाधिकारी या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायद्याच्या कलम १८४ च्या उप-कलम(३) द्वारे आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा १५ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

### सेवाप्रवेश नियमाचे प्रारूप

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील लेखा सेवेतील सहायक लेखाधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ब) " विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे ;

(क) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण ;

(ड) " पदोन्नतीसाठी पात्रता " म्हणजे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम किंवा आदेशाद्वारे निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती नुसार पदोन्नतीसाठी पात्रता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहायक लेखाधिकारी या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये पुढील नियमानुसार करण्यात येईल.

(अ) प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील लेखापाल संवर्गातील नियमित सेवेची तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या वर्षाची सेवा असलेल्या अधिकाऱ्यांमधून पात्रता व सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन ;

किंवा

(ब) राज्य शासनाच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवापरीक्षा-३ अर्हता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांमधून शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने,

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय / संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ९०:१० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या अधिकाऱ्याने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या अधिकाऱ्याला सूट मिळाली नसेल तर, त्या अधिकाऱ्याने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या अधिकाऱ्याने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या अधिकाऱ्याला सूट मिळाली नसेल, तर त्या अधिकाऱ्याने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या अधिकाऱ्याने, संचालक माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांचे संगणक हाताळण्याबाबतचे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.

८. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेला अधिकारी प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

९. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या अधिकाऱ्याला प्राधिकरणाच्या सेवेत नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित कवडे,**
शासनाचे उप सचिव.

**HOUSING DEPARTMENT,**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 8th January 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Housing and Area Development Act, 1976.

No.SEPRANI-2020/C.R.93/GRUNIBHU.— The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (*i*) of sub-section (*2*) of Section 184 read with sub-section (*5*) of Section 19 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all the existing rules, notifications, orders or any other instruments issued in this behalf to regulate recruitment to the post of Assistant Accounts Officer on the establishment of the Maharashtra Housing and Area Development Authority, is hereby published, as required by sub-section (*3*) of Section 184 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 15th of January 2026.

2. Any objection or suggestions, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft rules before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Assistant Accounts Officer, Maharashtra Housing and Area Development Authority (Recruitment) Rules, 2025.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(a) “ Authority ” means the Maharashtra Housing and Area Development Authority established under Section 3 of Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977);

(b) “ Department” means Housing Department of Government of Maharashtra ;

(c) “ Government ” means the Government of Maharashtra ;

(d) “ eligibility for promotion ” means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government from time to time ;

3. Appointment to the post of Assistant Accounts Officer on the establishment of the Authority, shall be made either,—

(1) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Accountant having not less than three years of regular and continuous service on that post; or

(2) by deputation of a person having not less than three years of regular and continuous service on the equivalent post and has passed the Maharashtra Finance and Accounts Services Examination-3 conduct by the Directorate of Accounts and Treasury, Mumbai and also in accordance with the terms and conditions specified in the rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time with prior approval of the Housing Department.

4. The appointment to the post mentioned in rules 3 by promotion and deputation shall be made in the ratio of 90:10.

5. A person before being appointed to the post mentioned in rule 3 on promotion shall be required to pass the Departmental Examination, if necessary, unless he has been exempted from passing the same.

6. A person appointed to post mentioned in rule 3 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post. Otherwise, such person shall not be eligible for promotion on the post mentioned in rule 3.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess Certificate of Computer Operation prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said post.

8. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred to any of the Board Office within the jurisdiction of the Authority in the State of Maharashtra.

9. The terms and conditions specified by the Government, from time to time, shall apply to the person appointed to the post mentioned in rule 3 after his appointment in the service of the Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT KAWADE,
Deputy Secretary to Government.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ८ जानेवारी, २०२६

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम(२) च्या खंड(एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील लेखापाल या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायद्याच्या कलम १८४ च्या उप-कलम(३) द्वारे आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा १५ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

### सेवा प्रवेश नियमाचे प्रारूप

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील लेखा सेवेतील लेखापाल (सेवाप्रवेश) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ब) " विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे ;

(क) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

(ड) " पदोन्नतीसाठी पात्रता " म्हणजे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम किंवा आदेशाद्वारे निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती नुसार पदोन्नतीसाठी पात्रता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील लेखापाल या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये पुढील नियमानुसार करण्यात येईल.

(अ) प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील लिपिक किंवा लिपिक-टंकलेखक पदावर कार्यरत असलेल्या आणि त्या पदावर किमान पाच वर्षांची नियमित व सलग सेवा पूर्ण केलेल्या तसेच महालेखापाल कार्यालयाने घेतलेली लेखापाल श्रेणी परीक्षा (श्रेणी-२) किंवा अन्य शासकीय/निमशासकीय विभागाकडून घेण्यात येणारी लेखापाल श्रेणी परीक्षा (श्रेणी-२) उत्तीर्ण झालेल्या, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या व्यक्तींमधून, सेवाज्येष्ठतेच्या आधारावर, योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन, किंवा

(ब) संचालक, लेखा व कोषागरे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात म्हाडा प्राधिकरणातील लेखापाल या पदाला समकक्ष पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून किंवा, महाराष्ट्र शासन अथवा इतर स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील तसेच महालेखापाल कार्यालयाकडून घेण्यात येणारी विभागीय लेखापाल पदासाठीची परीक्षा उतीर्ण केलेल्या समकक्ष पदावरील व्यक्तींमधून किंवा, म्हाडा प्राधिकरणातील लेखापाल या पदाला समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तींमधून शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रक/आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने,

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय / संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ९०:१० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल तर, त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल, तर त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, संचालक माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांचे संगणक हाताळण्याबाबतचे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.

८. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेला व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

९. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला प्राधिकरणाच्या सेवेत नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित कवडे,**
शासनाचे उप सचिव.

**HOUSING DEPARTMENT,**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 8th January 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.

No.SEPRANI-2020/C.R.93/GRUNIBHU.— The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (*i*) of sub-section (*2*) of Section 184 read with sub-section (*5*) of Section 19 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all the existing rules, notifications, orders or any other instruments issued in this behalf to regulate recruitment to the post of Accountant on the establishment of the Maharashtra Housing and Area Development Authority, is hereby published, as required by sub-section (*3*) of Section 184 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby ; and a notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 15th of January 2026.

2. Any objection or suggestions, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft rules before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Accountant, Maharashtra Housing and Area Development Authority (Recruitment) Rules, 2025.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(a) " Authority " means the Maharashtra Housing and Area Development Authority established under section 3 of Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977) ;

(b) " Department" means Housing Department of Government of Maharashtra ;

(c) " Government " means the Government of Maharashtra ;

(d) " eligibility for promotion " means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department, from time to time ;

3. Appointment to the post of Accountant on the establishment of the Authority, shall be made either,—

(*1*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Clerk or Clerk-*cum*-Typist in the establishment of the Authority having not less than five years of regular and continuous service on that post and has passed the Accountant Grade Examination (Grade-II) conducted by the Accountant General's Office or equivalent thereto ; or

(2) by deputation of a person who is having not less than three years of regular and continuous service on the equivalent post in Maharashtra Finance and Accounts Service under the jurisdiction of the Director, Accounts and Treasury or from among persons working in Government of Maharashtra or other local authorities who have passed the departmental accountant examination conducted by the Accountant General's office or, from among persons working in equivalent post to that of Accountant in the MHADA authority, in accordance with the Government's deputation policy and the deputation procedures prescribed by the department from time to time through Government resolutions/circulars/orders, etc.

No appointment to this post can be made by any other administrative department or office of the Government without the approval/consent of the Housing Department.

4. The appointment to the post mentioned in rules 3 by promotion and deputation shall be made in the ratio of 90:10.

5. A person before being appointed to the post mentioned in rule 3 on promotion shall be required to pass the Departmental Examination, if necessary, unless he has been exempted from passing the same.

6. A person appointed to post mentioned in rule 3 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post. Otherwise, such person shall not be eligible for promotion on the post mentioned in rule 3.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess Certificate of Computer Operation prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said post.

8. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred to any of the Board Office within the jurisdiction of the Authority in the State of Maharashtra.

9. The terms and conditions specified by the Government, from time to time, shall apply to the person appointed to the post mentioned in rule 3 after his appointment in the service of the Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT KAWADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.